राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठाचे कोल्हापूर व सोलापूर येथे द्वितीय अपील सुनावणी तसेच माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या अंमलबजावणीबाबत मार्गदर्शन आयोजन

राज्य माहिती आयुक्त श्री. मकरंद रानडे यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठाकडून कोल्हापूर व सोलापूर येथे जिल्ह्यांतील विविध सार्वजनिक प्राधिकरणांशी संबंधित द्वितीय अपिलांच्या सुनावणी तसेच प्रशासकीय अधिकाऱ्यांसाठी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या अंमलबजावणीबाबत मार्गदर्शन सत्रांचे आयोजन करण्यात आले.

या अंतर्गत दिनांक २० जुलै २०२६ ते २४ जुलै २०२६ या कालावधीत जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर येथे ३८५ द्वितीय अपिलांची व दिनांक ०५ ऑक्टोबर २०२६ ते ०९ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर येथे ४०१ द्वितीय अपिलांची सुनावणी प्रत्यक्ष तसेच ऑनलाइन माध्यमातून आयोजित करण्यात आली.

या कार्यक्रमांतर्गत या जिल्ह्यातील संबंधित सार्वजनिक प्राधिकरणांशी निगडित द्वितीय अपिलांची सुनावणी घेण्यात आली. यावेळी संबंधित अपीलकर्ते, जन माहिती अधिकारी (PIO), प्रथम अपिलीय अधिकारी (FAA) तसेच प्रशासकीय यंत्रणेतील संबंधित अधिकारी उपस्थित होते.

या सुनावणी कार्यक्रमासोबतच, दोन्ही जिल्ह्यात सार्वजनिक प्राधिकरणांमध्ये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची प्रभावी, पारदर्शक व नागरिकाभिमुख अंमलबजावणी सुनिश्चित करण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी व प्रशासकीय अधिकाऱ्यांसाठी विशेष मार्गदर्शन सत्रांचे आयोजन करण्यात आले .

या विशेष मार्गदर्शन सत्रांमध्ये मा. राज्य माहिती आयुक्त श्री. मकरंद रानडे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील संबंधित वैधानिक तरतुदी व कायदेशीर चौकट, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांची पदीय कर्तव्ये व वैधानिक जबाबदाऱ्या, माहितीच्या अर्जांवर विहित कालमर्यादेत करावयाची कार्यवाही, प्रथम अपीलाची प्रक्रिया तसेच माहितीचा अधिकार कायद्याची परिणामकारक व नागरिकाभिमुख अंमलबजावणी याबाबत उपस्थित अधिकारी व कर्मचारी वृंदास सविस्तर मार्गदर्शन केले.


जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर.
''माहिती अधिकार सप्ताह''
दिनांक ०५ ऑक्टोबर ते १२ ऑक्टोबर






जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर.
''माहिती अधिकार सप्ताह''
दिनांक ०५ ऑक्टोबर ते १२ ऑक्टोबर